# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०३/०४/२०१७

## *खाकीतील माणूसकी*

दिनांक २७/०३/२०१७ रोजी उपपोस्टे दामरंचा हद्दितील मौजा नैनगुंडम गावातील नामे वसंत सोनू शेगम या व्यक्तीचे घर अचानक लागलेल्या आगीने पुर्णपणे जळून राख झाले. त्यामध्ये त्याचे पूर्ण घर, संसार, कपडे, जमापूंजी जळून गेले. त्याचा परिवार ज्यामध्ये पत्नी, पाच छोट्या-छोट्या मुली फक्त अंगावरील कपड्याने रस्त्यावर आले. ही घटना जेव्हा उपपोलीस स्टेशन दामरंचा येथे समजली तेव्हा दामरंचा पोलीस पार्टीने आपत्तीग्रस्त कुटुंबाला भेट देवून त्यांना आपल्या पाठीशी पोलीस विभाग पूर्णपणे उभा आहे, अशी हिम्मत दिली. आणि सदर घटनेची माहिती मा. उपविभागीय पोलीस अधिकारी जिमलगट्टा श्री. अण्णासाहेब जाधव सा।. यांना देवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपपोस्टे दामरंचाचे प्रभारी अधिकारी सपोनि. श्री. विलास मोरे, पोउपनि. श्री. अनिल लवटे, अभिजीत भोसले, नागनाथ पाटील, गणेश मोरे आणि सर्व कर्मचारी यांनी आर्थिक मदत जमा करुन संसार उपयोगी भांडे, कुटुंबातील सर्व सदस्यांना कपडे, किराणा सामान खरेदी करुन दिले आणि आगीमुळे सर्व संसार जळून राख झाल्याने रस्त्यावर आलेल्या कुटुंबाला उपपोलीस स्टेशन पोलीस पार्टी एका हाताने नक्षल्यांशी आदिवासींच्या विकासासाठी सामना करत असतांना दुसऱ्या हाताने मदतीचा हात देत त्यांचा संसार पुन्हा उभा करुन देवून पोलीस दलाच्या ब्रीद वाक्याचा सद्रक्षणाय खलनिग्रहणाय (सज्जनांचे रक्षण आणि वाईटांचा नायनाट) प्रत्येय आणून दिला.


उप पोलीस स्टेशन
ता.अहेरी •दामरंचा• जि.गडचिरोली
सर्वत्र विजय